पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. २५
वर्ष ८ वे, अंक १७ वा
किंमत १ रुपया
२१ डिसेंबर १९९१

शेतकरी संघटक

# भारत दशकातील चतुरंग शेती

— शरद जोशी

शेतकरी संघटनेचा शेगावचा जाहिरनामा घोषित झाल्यानंतर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह अनेकांच्या मनात प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे की इतके दिवस शेतकरी संघटनेने ज्या गोष्टींची चेष्टा केली, उपहास केला; ज्या गोष्टींतून शेतकऱ्यांचं भलं होणार नाही असं लोकांना ठासून सांगितलं त्याच गोष्टी शेतकरी संघटना आता शेतकऱ्यांना उलटून सांगायला लागली आहे की काय?

## चतुरंग शेती म्हणजे शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याचा सहज आविष्कार

पूर्वी जर कुणी येऊन सांगायला लागलं की शेतीला पाणी मिळायला पाहिजे; खतं किती वापरा, औषधं किती वापरा तर आम्ही त्याची चेष्टा करत होतो आणि म्हणत होतो की 'आबा पाटला' च्या सांगण्याप्रमाणे आम्ही खुरपण्या खूप वेळा केल्या, आणि म्हशी गाई ठेवून बघितल्या, कारली लावली, तोंडली लावली पण डोक्यावर कर्ज चढण्यापलिकडे काही झालं नाही. लोकांना आग्रहाने आम्ही सांगत होतो की शेती करण्याची कोणतीही पद्धत किफायतशीर नाही; कारण 'शेतकऱ्याचं मरण हे सरकारचं धोरण आहे.' आणि आज आपण शेती कशी करावी, कोणती खतं वापरावीत असलं काही उलट बोलायला लागलो आहोत का काय?

आम्ही असं म्हणत होतो की साखर कारखाना निघाला, सूतगिरणी निघाली, कृषिउत्पन्न बाजार समिती निघाली, व्यापाराची व्यवस्था झाली, बँकेची व्यवस्था झाली, पतपुरवठ्याची व्यवस्था झाली, कारखान्याची व्यवस्था झाली तरी परिणाम एकच झाला; शेतकऱ्याच्या अंगावर जेवढी काही सालटी होती तेवढीसुद्धा निघून गेली. आणि आज आम्ही शेतकऱ्यांना व्यापार करा किंवा प्रक्रिया करा असं नेमकं उलटं सांगायला लागलो आहो की काय?

एका काळी मी असं म्हटलं होतं की पाण्याचं वाटप कसं व्हावं याबद्दल माझी काही व्यक्तिगत मतं आहेत, पण त्याबद्दल मी बोलू इच्छित नाही. गावागावामध्ये वैद्यकीय व्यवस्था कशी व्हावी यासंबंधीही मी काही बोलू इच्छित नाही. असं का? त्यावेळी मी असं म्हटलं होतं की, "एखाद्या जन्मांधाला जर डोळे आले तर जग कसं दिसेल याचं चित्र त्याला कधी सांगता येणार नाही; ज्याने आयुष्यात कधी प्रकाश पाहिलाच नाही तो मनुष्य त्याला दृष्टि आली आणि प्रकाश दिसू लागला तर जग कसं दिसू लागेल याचं वर्णन काय करणार? आणि आपण त्याच्यासमोर जगाचं कितीही वर्णन केलं तर त्याला त्यात काय समजणार? तसंच पिढ्यान् पिढ्या शेती तोट्यात चालवणारा शेतकरी हा माणूस म्हणून जगण्याचं स्वातंत्र्य जर मिळालं तर कसं काय जगेल याचे आराखडे आता बनवायला लागू नका. शेतकऱ्याला लुटणाऱ्या माणसांनी विद्यापीठांमध्ये, वेगवेगळ्या संस्थांमध्ये शेती कशी करावी याचे आराखडे बनविण्याचे काही कारण नाही. ज्यावेळी शेतकरी माणूस बनेल आणि स्वतंत्र बनेल

***वर्धा येथे १५, १६, १७ डिसेंबर १९९१ रोजी शेतकरी संघटनेच्या महाराष्ट्रभरच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत शेतकरी संघटनेच्या शेगावच्या जाहिरनाम्यातील चतुरंग शेतीच्या कल्पनेचे विश्लेषण श्री. शरद जोशी यांनी आपल्या भाषणात केले. आजपर्यंत सतत गुलामगिरीत जखडल्यामुळे दारिद्र्यात खितपत पडलेल्या शेतकऱ्याला शेती, प्रक्रिया, व्यापार इत्यादि विषयांत अनाहूत सल्ले देणारे अनेक बुजुर्ग होऊन गेले. त्यांचे सल्ले ऐकून शेतकरी दारिद्र्यात अधिक खोल बुडाले, त्यांचे गुलामगिरीचे पाश अधिक घट्ट झाले. आज शेतकरी या गुलामगिरीच्या पाशातून मोकळा झाला आहे. आता स्वतंत्र झालेला शेतकरी दारिद्र्यातून बाहेर येण्यासाठी बुजुर्गांचे सर्व अनाहूत सल्ले बाजूला ठेवून स्वतःच्या बुद्धीने शेती — चतुरंग शेती करणार आहे.***

***भारत दशकातील चतुरंग शेतीचा अर्थ श्री. शरद जोशींनी आपल्या भाषणात सांगितला. त्या भाषणावरून हा लेख शब्दांकित केला आहे.***

— संपादक

तेव्हा तुमच्या कल्पनेमध्येसुद्धा येणार नाही असे अप्रतीम मार्ग - शेती करण्याचे, प्रक्रिया करण्याचे, व्यापार करण्याचे, निर्यात करण्याचे - तो दाखवून देईल."

काही लोकांना खूप आनंद वाटायला लागला आहे. ते म्हणू लागले आहेत की शेतकरी संघटना आता रुळावर आली आहे. इतके दिवस जे आम्ही म्हणत होतो तेच आता शेतकरी संघटना म्हणू लागली आहे असं म्हणण्यात त्यांना खूप आनंद होऊ लागला आहे. अनेक थोर थोर नेत्यांची मला पत्रं येऊन राहिलीत की शेतकरी संघटनेने आता विचार अधिक व्यापक करायला सुरूवात केली या गोष्टींनी त्यांना फार आनंद झाला आहे. म्हणजे 'आम्ही फार शहाणे होतो, तुम्ही इतके दिवस मूर्खासारखे चालला होता, आमच्या रस्त्याला आलात बरं झालं.' असंच जणू त्यांना म्हणायचं आहे!

शेतकरी संघटनेच्या शेगावच्या जाहिरनाम्याने दिलेल्या भारत दशकातील चतुरंग शेतीच्या कार्यक्रमाबाबत अशी काही गैरसमजूत, निदान शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची होऊ नये आणि झाली असल्यास ती दुरुस्त व्हावी.

एक महत्त्वाचा नियम लक्षात ठेवा. रात्र संपते आणि दिवस उगवतो. काळीकुट्ट अंधारी रात्र नेमकी संपली कधी आणि पहाटेची सुरुवात झाली कधी याची जर कुणाला रेषा निश्चित करायला सांगितली तर ते करणे अशक्य आहे. जगामधील सगळे महत्त्वाचे बदल हे असे अलगद पावलांनी येऊन जातात, कधी येऊन जातात ते समजतसुद्धा नाही. मोठा आवाज करून, धूमधडाक्याने एखादा बदल घडला तर समजा, हा बदल फालतू आहे. इंदिरा गांधींच्या जागी राजीव गांधी आले, वर्तमानपत्रात खूप आवाज झाला, याचा अर्थ काही हा खरा मोठा बदल नाही. एखाद्या देशात क्रांती झाली म्हणजे काय? लोकांना लुटणारं एक सरकार जाऊन लोकांना लुटणारं दुसरं सरकार आलं म्हणजे फार मोठी क्रांती झाली की काय? गोरा इंग्रज गेला, लाल किल्ल्यावर तिरंगी झेंडा लागला, नवीन पंतप्रधान सफेद अचकनीतले, गुलाब लावणारे झाले, गोऱ्या इंग्रजाच्या जागी काळा इंग्रज आला ही काही क्रांती झाली नाही. पण, वर्तमानपत्रात ज्याचा झणझणीत, घणघणीत आवाज होतो तो मोठा बदल झाला असं आजकाल सगळ्यांना वाटतं. एखाद्या राज्याचा एक मुख्यमंत्री जाऊन दुसरा मुख्यमंत्री झाला तरी वर्तमानपत्रांची भाषाच अशी बदलते की जणू काही सारं जगच बदललं! खरं म्हटलं तर काही सुद्धा फरक पडलेला नसतो.

फार महत्त्वाचे बदल असे अलगद येऊन जातात की त्याचा आपल्याला पत्तासुद्धा लागत नाही. असा बदल शेतकऱ्यांच्या बाबतीत घडला आहे.

'शेगावच्या जाहिरनाम्या'मधील पहिला मुद्दा हा आहे. ज्या ज्या साधनांनी शेतकऱ्यांना बांधून ठेवलेलं होतं ती साधनं आता सरकारच्या हाती सध्या तरी नाहीत; उद्या परत आली तर बघू. निदान, ज्या प्रमाणात त्यांच्याकडं ती साधनं होती त्या प्रमाणाततरी नाहीत. अशा परिस्थितीत पुढचे पाऊल कसे टाकायचे हा खरा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे.

एक जुन्या नाटकातला प्रसंग आहे. पंतोजी एका श्रीमंत व्यापाऱ्याला गद्य म्हणजे काय हे शिकवायला प्रयत्न करतात. 'कविता म्हणजे पद्य, कविता नाही ते गद्य.' गद्याचा अर्थ शिकता शिकता तो व्यापारी काय म्हणतो? अरे, गद्य म्हणजे आपण नेहमी बोलतो तेच ना? तसाच, हा शेगावचा चतुरंग शेतीचा कार्यक्रम म्हणजे काय आहे? शेतकऱ्याच्या पायात जन्मल्यापासून ज्या बेड्या पडलेल्या असतात त्या तशा जन्मल्यापासून नसत्या तर तो जन्मतः जसं वागायला लागला असता त्याची ही रूपरेषा आहे; यात नवीन काही नाही.

जर का, शेतकऱ्यांना आजपर्यंत या गुलामगिरीचा अनुभव कधी घ्यावा लागला नसता तर त्यांनी काय केलं असतं? शेती कशी केली असली? व्यापार कसा केला असता? प्रक्रिया कशा केल्या असत्या? निर्यात कशी केली असती? हे आपोआपच जमलं असतं. फक्त, आपण जन्मांध जे जन्मलो, आता दृष्टी आल्यानंतर जाणवणाऱ्या या प्रकाशाशी कसं काय वागायचं हे समजत नाही म्हणून ही चतुरंग यादी करायला लागली.

पण हा कार्यक्रम म्हणजे आता परिस्थिती ९१ साली बदलल्यानंतर, शेती कशी करावी हे सांगणारे 'आबा पाटील', साखरेची प्रक्रिया कशी करावी हे सांगणारे 'विखे पाटील', निर्यात करणारे आणि कोणी, व्यापार करणारे आणि कोणी यांच्या मार्गाने आम्ही आता जायला लागलो आहोत ही कल्पना सपशेल चूक आहे. उलट, शेती, प्रक्रिया, व्यापार आणि निर्यात या चारही क्षेत्रांमध्ये आजपर्यंत बुजुर्गांनी जे जे मांडलं ते उधळून फेकून देण्याकरिता शेगावचा हा चतुरंग कार्यक्रम आहे. आतापर्यंत, शेती कशी करावी याच्याबद्दलच्या ज्यांनी ज्यांनी कल्पना मांडल्या त्या सगळ्यांनाच चुकीचं ठरवणारा असा हा कार्यक्रम आहे. कारण, आता जन्मांधाला दृष्टी आली आहे, दृष्टी आल्यानंतर तो जुन्या पंडितांनी सांगितलेलं काहीही मानायला तयार नाही.

## सुरुवातीच्या वेदना ही स्वातंत्र्याची किंमत आहे

या मधल्या काळामध्ये संघटनेने काय काम केलं? चीनमधल्या स्त्रियांविषयी एक हकीकत आहे. चीनमध्ये एकेकाळी अशी कल्पना होती की खानदानी स्त्री कोणती? तर जिला कधीही पलंगावरून उतरून चालावं लागत नाही ती खरी खानदानी असं समजलं जायचं. हरियाणामधला शेतकरी भल्यामोठ्या साफ्याचा फेटा घालतो. एवढ्या मोठ्या साफ्याचा फेटा घालणं म्हणजे किती कठीण? त्याला स्टार्च लावून लावून तो फेट्याचा साफा ताठ ठेवावा लागतो तोच जर मजुराचा फेटा असेल तर तो कसातरी गुंडाळला तरी चालतो. कारण त्या मजुराला आपल्या फेट्यावर मालाचं ओझं घेऊन जावं लागतं. शेतकऱ्याच्या साफ्याच्या फेट्याचा तुरा ताठ आहे याचा अर्थ काय? मला काम करावं लागतं नाही असा मनुष्य आहे मी! तशी चीनमधल्या खानदानी महिलांची ऐट काय? यांना पलंगावरून उतरायला न लागल्यामुळे यांचे पाय अगदी बारीक राहतात. मग ते पाय बारीक राहावे या करिता मोठे प्रयत्न! जन्मल्याबरोबर मुलीचे पाय पट्टयाने बांधून टाकीत. मग ते पाय साहजिकच लहान राहत,

आणि तसे राहावे म्हणून कायम पट्ट्यात राहात. पाय लहान राहात पण लहानपणापासून बांधलेले राहिल्यामुळे पुढे त्या मुलींना जन्मभर त्या पायांवर उभं राहणंसुद्धा शक्य होत नसे. चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट आली तेव्हा त्यांनी पहिल्यांदा ही क्रूर अमानुष पद्धत बंद केली. जन्मतः ज्यांच्या पायांना पट्ट्या बांधल्या होत्या त्या मुलींच्या पट्ट्या जेव्हा सोडल्या जाऊ लागल्या तेव्हा त्या मुलींनी कळवळून विनंती केली की आता आमच्या पायातून पुन्हा रक्त खेळू लागलं आहे याच्या वेदना आम्हाला सहन होत नाहीत, कृपा करून पट्ट्या सोडू नका, आमची पिढी अशीच जाऊ द्या.

आपल्यावर थोडीशी अशीच वेळ येणार आहे. जन्मतः पायाला पट्ट्या बांधलेल्या, आमच्या पायातून रक्त खेळायची आम्हाला सवय नाही आणि या पट्ट्या काढतात म्हटल्यावर एकदा त्या पायातून रक्त धावायला लागल्यानंतर त्याच्या वेदना आम्हाला सहन होऊ शकणार आहेत किंवा नाही हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

इतके दिवस त्या मानाने बरे होतो. शेती आपण करत होतो, सरळसोट. नांगराला बैल जुंपलेले तसे शेतीला शेतकरी जुंपलेला. नांगर दिलेल्या तासाने घेऊन जाण्याचं काम बैलाचं आणि कुणबी जन्मलो म्हणून कुणब्यासारखं शेती करत राहायचं काम आमचं शेतकऱ्याचं! दुःख होत होतं, चांगलं जगता येत नव्हतं, माणूस म्हणून जगता येत नव्हतं, आमची घरची बायापोरं जनावरासारखी जगत, वाढत होती. कुटुंब म्हणजे काय हे आम्हाला माहीत नव्हतं. मग, त्यामुळं जे काय समाधान कमी पडत असेल ते गावातल्या वादावादीमध्ये, गावातल्या भांडणांमध्ये, एकमेकांची डोकी फोडून विनाकारण गुर्मीमध्ये फिरून थोडं फार मिळवत होतो. पण आता पुढं टाकलेलं आयुष्य किती कठीण आहे! पूर्वीच्या काळी कमी पडलं तर माझ्यासारखा एखादा पुढारी आला आणि सांगू लागला, 'शेतीमालाला भाव मिळायला पाहिजे, चला' की गाडीला भोंगे बांधले आणि 'चलो शेगाव' म्हणत चालले!

स्वातंत्र्य उपभोगणे इतकं सोपं नाही. उलट, गुलामीची एकदा सवय पडली म्हणजे फार सोयीची असते. तुम्हाला काय कुणी गुलाबांच्या वाटेवरून चालायला बाहेर नाही काढलेलं? तुम्हाला माणूस म्हणून जगायचा फक्त अधिकार दिला आहे. शेतकरी संघटनेच्या प्रतिज्ञेने इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने तुम्हाला जगता येईल असं म्हटलं. माणूस म्हणून जगायचा हा मार्ग तुम्हाला न कळता खुला झालेला आहे. सुख मिळविण्याच्या प्रयत्नांना आता कुणी अटकाव करणार नाही. १९४२ सालच्या लढाईने कधी वाटलं होतं की आता स्वातंत्र्य मिळेल? झालंच काय ४२ सालच्या आंदोलनात? खरे आकडे पाहिले तर पाचपंवीस माणसं मेली, पाचपन्नास हजार माणसं फक्त तुरुंगात गेली. ब्रिटिश सत्तेला त्यामुळे ढिम्मसुद्धा धक्का लागला नव्हता. पण, दुसऱ्या महायुद्धाच्या ज्वाळा सगळीकडे पसरल्या आणि त्यामध्ये इंग्लंड असा काही पोळून निघाला की हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याचा मार्ग आपल्याला न कळत मोकळा झाला. तसं, दहा वर्ष आपण टक्कर दिली तरी शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याचा मार्ग इतक्यात खुला होईल असं वाटत नव्हतं. पण जागतिक परिस्थिती अशी बदलली की आपल्या शत्रूच्या हातातील शस्त्रं गळून पडली आहेत, तात्पुरती तरी गळून पडली आहेत. याच्यापुढे जायचा मार्ग तुम्हाला शोधून काढायचा आहे.

## सीताशेती म्हणजे बुद्धीवर आधारित प्रयोग

शेती कशी करावी? सीताशेती म्हणजे आहे तरी काय? सीता शेती, माजघर शेती, व्यापारी शेती आणि निर्यात शेती – या चतुरंग शेतीमध्ये आजपर्यंतच्या दुड्ढाचार्यांनी मांडलेल्या प्रत्येक कल्पनेचा निषेध आहे, अधिक्षेप आहे. कुणी आम्हाला सांगितलं वरखतं वापरा, यूरिया वापरा, अमुक डोस वापरा, तमुक डोस वापरा! आता आम्ही म्हणतो आहोत की शेतीमालाची किंमत सरकार पाडू शकत नाही, ठरवू शकत नाही आणि देऊही शकत नाही; आम्हीच आमच्या पायावर उभं राहायचं आहे; सरकार संपलं आहे तेव्हा आता आम्ही गुलामीत जन्मलो नसतो तर शेती जशी केली असती तशी शेती करायची ठरवणार आहोत.

सीताशेती म्हणजे नैसर्गिक शेती नाही, सीताशेती म्हणजे जैविक शेती नाही. फक्त गायीचंच शेण वापरावयाचं, गोमूत्रच वापरायचं असली अजागळ कल्पना मांडणारी ही सीताशेती नाही. खऱ्या अर्थाने शेती ही विज्ञानावर, बुद्धीवर आणि व्यापारावर आधारित करण्याचा पहिला प्रयोग जगामध्ये आज इथं सीताशेतीच्या रूपाने चालू होत आहे. आम्हाला शक्य नव्हतं म्हणून आम्ही शेणखत वापरलं. मग विज्ञान आलं आणि कुणी सांगायला लागलं यूरिया वापरा, कुणी सांगायला लागलं फॉस्फेटचे डोस द्या, कुणी म्हटलं एन्डोसल्फान मारा, तेरा फवारे मारा, चौदा फवारे मारा. आणि कुणी तरी सांगितलं म्हणून आम्ही तसं केलं.

आता परिस्थिती बदलली आहे. जन्मांधाला डोळे आले आणि आम्ही आता सरळ प्रश्न विचारायला लागलो आहोत की जर का आम्हाला ही शेती करायची असेल आणि जर का आम्हाला भाव बांधून देणारं कुणी राहिलं नसेल आणि भाव पाडणारंही कुणी राहिलं नसेल तर माणूस म्हणून आम्ही शेती कशी काय करायची आहे? पहिली गोष्ट, सगळा वाह्यात खर्च बंद. शक्यतो, बाहेरून काही आणायचंच नाही. शून्य. सीताशेतीचा पहिला पाया शून्यशेती. बाहेरून काही न आणता काही करता येतं की नाही? अगदीच काही लागणार असेल तर बघू. पण अशीच शेती करणं आपल्याला भाग पडणार आहे. सध्याची जी हरितक्रांतीची शेती आहे त्याला पर्याय शोधायलाच लागणार आहे. पर्यायाला पर्याय नाही. तुम्ही जर असं म्हटलं की ही 'यूरिया'ची शेती तुम्ही चालवत राहाल, 'एन्डोसल्फान'ची शेती चालवत राहाल तर ते शक्य नाही. याचं पहिलं कारण असं की येत्या दहा वर्षात जगामध्ये तुम्हाला पुरेल इतका 'यूरिया' पुरवेल इतकं पेट्रोल शिल्लक राहणार नाही. आणि तुम्ही 'एन्डोसल्फान' मारून भाजी पिकवली तर ती खाणारांना कॅन्सर होतो हे सिद्ध होत आहे. त्यामुळे ही भाजीसुद्धा पुढे कुणी खाणार नाही. दुसरा मार्ग आपल्याला शोधायलाच लागणार आहे. तो शोधायचा कसा? त्याचे आचरट मार्ग सांगणारे पुष्कळ निघताहेत. कालच एका ठिकाणी गेलो होतो. त्यांच्याकडे पीक चांगलं निघतं असा त्यांचा दावा आहे. आणि

'अमक्या अमक्याचं असं म्हणणं आहे की गोमूत्राचा वापर केला तर चांगलं पीक निघतं' असं ते भक्तिभावानं सांगतात. मी विचारलं, "गोमूत्राच्या ऐवजी म्हशीचं वापरलं तर चालेल की नाही हो?" पण त्यांचं अंतःकरण गलबललं. त्यांना सांगायचं होतं की, "आमच्या पूर्वजांनी गायीला पवित्र मानलं त्याचा यामागं आधार काही तरी आहे." म्हणजे, शेतकऱ्यांची काय ओढाताण चालली आहे? आम्ही एका बाजूला यूरियासारखा पेट्रोलियम पदार्थ वापरा म्हणून सांगणाऱ्या दलालांच्या हातून सुटू पाहतो आहोत तर तेवढ्यात आम्हाला हे जुने गायत्रीमंत्र शिकवणारे पंडीत आपल्यात ओढून घ्यायला पाहात आहेत. आणि सीताशेतीचा खरा अर्थ असा आहे की या जुन्या आणि नव्या दलालांपासून, दोघांपासूनही वाचून बुद्धीवर शेती करायला शेतकरी तयार झाला आहे. हे काम मी, माझ्या बुद्धीप्रमाणे, कुणावर सोपविलं आहे? शेतकऱ्यांना तर आपली शेती करायचीच आहे. दररोजची शेती चालवायची आहे, पोट भरायचं आहे. सीताशेतीचा निष्कर्ष कळेपर्यंत शेती आपल्याला बंद नाही ठेवता येणार. ते काम आपल्याला चालूच ठेवायचं आहे. मग हे काम ज्यांना आजपर्यंत आपण सर्वात निर्बुद्ध समजलो, 'त्यांना काय अक्कल, तुमची अक्कल चुलीपुढं' असं म्हणून हिणवलं त्या महाराष्ट्रातल्या शेतकरी स्त्रियांनी प्रामुख्याने पार पाडावं अशी मी योजना केली. आणि सुरुवात त्यांनीच केली आहे. पहिली शेती काही पुरुषांनी नाही केली, पहिली शेती स्त्रियांनी केली. नुसत्या काटक्या घेऊन. त्या जमिनीमध्ये नांगर घालणे म्हणजे भूमातेला जखमी करणे असं समजत असत आणि शेती करीत असत. स्त्रियांना बाजूला करून पुरुषांनी शेती हातात घेतली कारण बैलाला वेसण घालणे आणि बैलाने नांगर ओढून घेणे ही ताकद शेतकरी पुरुषाकडे आली. शेतीवर पहिला पराभव स्त्रियांचा झाला. पराभव स्त्रियांचा झाला, जनावरांचा झाला आणि बैलवाले पुरुष पुढे आले. आणि या बैलवाल्या पुरुषांचा पराभव घोडेवाल्या पुरुषांनी घोडेस्वार बनून हातात तलवार घेऊन केला. आता हे युग संपलं आहे आणि आपण पुन्हा शून्याकडे जात आहोत. जेथून सुरुवात व्हायला हवी होती तिथे जातो आहोत. सीताशेती म्हणजे नैसर्गिक शेती नाही, सीताशेती म्हणजे जैविक शेती नाही. आम्ही जो मार्ग काढू तो जुनाट पद्धतीचा असेल असे नाही. कदाचित्, आज शास्त्रज्ञांना अवगत नसलेली, कॉम्प्युटर नव्हे तर सुपरकॉम्प्युटर वापरणारी शेती आम्ही करू. पण ती आमच्या बुद्धीने आणि आमच्या प्रयोगांनी आम्ही ठरविणार आहोत–

याच्याकरिता प्रयोगशाळा कुठून आणायच्या? विज्ञानशाळा कुठून आणायच्या? आपल्याकडे विद्यापीठे नाहीत, दहा दहा हजार रुपयांचा फुकट पगार खाऊन बसणारी प्राध्यापक आणि वैज्ञानिक मंडळीही नाहीत. हा प्रयोग आपल्या शेतावर, आपल्या घरामध्ये, आपल्या परसदारामध्ये, दहा बाय दहाच्या लहानशा जमिनीमध्ये सगळ्या महाराष्ट्रातल्या शेतकरी स्त्रिया करतील. अशी सीताशेतीची कल्पना आहे.

हा मुद्दा यासाठी मांडला की कुणाही माणसाच्या डोक्यामध्ये अशी कल्पना येऊ नये की अरे, फलाणा फलाणा मनुष्य कितीक दिवस सांगतो आहे की नैसर्गिक शेती करा, फलाणा फलाणा मनुष्य कितीक दिवस सांगतो आहे की गोमूत्राची आणि गायीच्या शेणाची शेती करा आणि शेतकरी संघटनाही आता तेच सांगायला लागली. असं वाह्यात समाधान या मंडळींना कणभरसुद्धा आणि क्षणभरसुद्धा मिळण्याचं कारण नाही.

## माजघर प्रक्रिया कारखाने काढणारी नाही

'माजघर शेती' म्हणजे प्रक्रियेची शेती. या बाबतीतही असाच प्रकार आहे. ही मंडळी फार शहाणी होती म्हणून त्यांनी साखरेचे कारखाने काढले, ही मंडळी फार शहाणी होती म्हणून त्यांनी सुताच्या गिरण्या काढल्या आणि आम्हाला इतके दिवस अक्कल नव्हती म्हणून आम्ही रस्त्यावर जात होतो. आणि आता यांचा शहाणपणा पटला म्हणून आम्ही पुन्हा साखरेच्या कारखान्यांकडे व सुताच्या गिरण्यांकडे जातो आहोत असं नाही. 'माजघर शेती' ही कल्पना शेतीच्या प्रक्रियांसंबंधी आजपर्यंत मांडल्या गेलेल्या सगळ्याच कल्पनांचा उच्छेद करणारी आहे. त्यांतली एकही कल्पना मान्य न करणारी आहे. यावर अनेक प्रकारच्या टीकाटीप्पण्या होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जुन्या प्रक्रियाकल्पनांचा थोडा आढावा घेणे आवश्यक आहे.

डॉ. कूरियन यांनी गेले वर्षभर खूप प्रचार चालवला आहे की दुधावर प्रक्रिया करणे – त्याचं आईस्क्रीम बनवणे, श्रीखंड बनवणे – अशा तऱ्हेची परवानगी नेस्लेसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना देऊ नये. कारण काय? त्यांनी असं म्हटलं की, खरा मलिदा, खरी साय, खरं लोणी तर आईस्क्रीम आणि श्रीखंडात आहे, दूध विकण्यात नाही. 'ऑपरेशन फ्लड'वर किंवा आणंदच्या डेअरीवर मुंबईला दूध पुरवण्याची जबाबदारी आहे; त्यांनी दूध पुरवायचं आणि नेस्लेसारख्या कंपन्यांनी आईस्क्रीम बनवायचं, हे चुकीचं आहे, अन्याय्य आहे अशी डॉ. कूरियन आरोळी ठोकतात. इकडे, सूरतची सुमूल डेअरी हिंदुस्थानामध्ये दुधाला सगळ्यात जास्त भाव देते. म्हशीच्या ६ टक्के स्निग्धांशाच्या दुधाला दर लिटरला ७ रुपये भाव देणारी ही हिंदुस्थानातली एकमेव डेअरी आहे. या सुमूल डेअरीच्या अध्यक्षांना विचारलं की, "तुम्ही इतका भाव कसा काय देऊ शकता?" ते म्हणतात, "आम्ही इतका भाव देऊ शकतो याचं कारण आम्ही आईस्क्रीमबिस्क्रीम बनवण्याच्या फंदात पडत नाही; लोकांना दूध पाजतो आणि त्याच्यातच सगळ्यात जास्त फायदा आहे." हे गूढ काय आहे? एका बाजूला डॉ. कूरियन म्हणतात की प्रक्रिया केल्याने फायदा जास्त मिळतो आणि सुमूलचे अध्यक्ष सांगतात प्रक्रियेच्या फंदात न पडल्यानेच फायदा होतो. याचा खरा अर्थ समजून घेतला पाहिजे. याचा खरा अर्थ असा आहे की डॉ. कूरियन काय, महाराष्ट्रातले तात्यासाहेब कोरे काय आणि गावोगावचे दूध सम्राट काय – या सगळ्यांची दुधावर प्रक्रिया करण्याची कल्पना काय आहे? सदस्यांकडून शेअर भांडवल गोळा करणे, त्या शेअर भांडवलाच्या आधाराने सरकारकडून आणखी पैसे मिळविणे, ते पैसे नेऊन एखाद्या कंपनीसमोर ठेवणे, त्यांच्याकडे यूरोपमध्ये किंवा अमेरिकेमध्ये तयार झालेली किंवा त्या पद्धतीची जी काही यंत्रसामुग्री असेल ती

यंत्रसामुग्री विकत घेणे, त्याच्याकरिता कोट्यावधी रुपये देणे, आणि ती कोट्यावधी रुपयांची यंत्रसामुग्री येऊन पडली की त्याला एक मॅनेजिंग डायरेक्टर, इंजिनिअर्सची फलटण लागते, त्यांचे पगार ठराविक असतात, कामगारांना पगार द्यावा लागतो, मध्यभागी कारखान्याची एक इमारत बांधावी लागते, त्यात संचालकांचं एक चांगलं ऑफिस ठेवावं लागतं, त्याभोवती गुलाबाच्या चांगल्या बागा फुलवाव्या लागतात, नारळही वाढवावे लागतात आणि इतका सगळा खर्च झाला म्हणजे ऊस पिकवणाऱ्या आणि दूध तयार करणाऱ्या शेतकऱ्याच्या हाती धत्तुरासुद्धा येत नाही. प्रक्रियेची ही कल्पना शेतकरी संघटनेच्या या प्रयोगामध्ये त्याज्य ठरवलेली आहे. हिंदुस्थानात अशा प्रकारची यंत्रसामुग्री पुरविणारी 'अल्फा लव्हाल' या नावाची सर्वात मोठी कंपनी आहे. सोयीसाठी या प्रक्रियाकल्पनेला आपण 'अल्फा लव्हाल' प्रक्रिया म्हणूया. आमच्या या प्रयोगात 'अल्फा लव्हाल' प्रक्रिया आम्ही नाकारतो आहोत.

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा. आपण कोणत्या तऱ्हेची प्रक्रिया करणार आहोत. 'अल्फा लव्हाल'ची नाही. हे सगळे कारखानदार हे बोलून चालून राजकारणात पडलेले. उघडच मलिदा खायला निघालेले. साखर कारखाना काढायला निघालेल्या कोणाही माणसाला विचारलं की कायरे, तू लोकांचं भलं करणार का? तर तो तुम्हाला प्रामाणिकपणे म्हणेल, तुमचा मित्र असेल तर, "काही तरी काय विचारता? कारखाना काय लोकांचा फायदा करून देण्याकरिता काढायचा असतो काय?"

दुसराही एक प्रकार लक्षात घ्यायला हवा. शेतकरी सघंटनेच्या सुरुवातीला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची मुलुखमैदान तोफ म्हणून गाजलेले श्री. माधवराव खंडेराव मोरे यांनी अत्यंत प्रामाणिकपणे पिंपळगावला प्रक्रियाक्षेत्रामध्ये पदार्पण केलं आणि द्राक्षापासून शँपेन काढून परदेशात पाठविण्याची योजना राबविली. यंत्रसामुग्री ही पुन्हा 'अल्फा लव्हाल'ची. आणि शँपेन परदेशात विकायची म्हणजे सी-थर्टी साखर काढून पोत्यामधून विकण्याइतकं सोपं नाही! त्याची बाटलीही परदेशातलं,त्याचं लेबलही परदेशातलं, त्याचं बूचही परदेशातलं आणावं लागतं. आता माधवरावही म्हणू लागले की त्यांनासुद्धा लोकांना द्राक्षाचा भाव किलोला दहा रुपयांच्या वर देता आला नाही.

म्हणजे मोठं यंत्र कुठून तरी घ्यायचं, ते एकाजागी उभं करायचं, तिथं काही संचालक मंडळी नेमायची आणि त्यातून प्रक्रिया करून शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळेल ही कल्पना अत्यंत चुकीची, अत्यंत खोटी आहे. मग, नेस्लेसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्या प्रक्रिया करून फायदा काढतात हे डॉ. कूरियनचं म्हणणं चूक आहे का? नाही. या कंपन्यांना फायदा होतो हे खरं आहे. पण त्याचं मुख्य कारण प्रक्रियेसाठी त्या वापरत असलेली यंत्रसामुग्री आणि तंत्रज्ञान त्यांनी स्वतःच विकसित केलेलं असतं हे आहे.

एक तिसरं उदाहरण घेऊ. मुंबईला नुकतंच एक शेतीमालावरील प्रक्रियासंबंधी प्रदर्शन झालं. दिल्लीला १५ जानेवारीपासून एक त्याहून मोठं प्रदर्शन आहे. शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या ज्या हिंदुस्थानातील कंपन्या आहेत त्यांचा माल तिथं ठेवला जाईल. या प्रदर्शनांत काय माल ठेवतात? यूरोपातला मनुष्य ज्या तऱ्हेचा जॅम खातो त्या तऱ्हेचा जॅम, तो ज्या तऱ्हेचा फळाचा रस आवडीने पितो त्या तऱ्हेचा रस बाटल्यांमध्ये भरलेला, यूरोपीय लोकांच्या खाण्याच्या पद्धतींमध्ये जे काही पदार्थ बसतात ते पदार्थ आम्ही हिंदुस्थानामध्ये त्यांनी तयार केलेली यंत्रं आणून किंवा त्या पद्धतीची यंत्र करून ते पदार्थ तयार करतो आणि ते पदार्थ त्यांना विकायचा प्रयत्न करतो. हे शक्य नाही. त्यांच्यापेक्षा चांगला 'जॅम' तुम्ही बनविणे शक्य नाही. त्यांनी दिलेली यंत्र-सामुग्री आणून तुम्ही 'शॅम्पने'ची फॅक्टरी बनवलीत, अगदी अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणून बनवलीत तरी तिकडे त्यापेक्षा अधिक आधुनिक यंत्रसामुग्री तयार होत राहणार. मग तुमची फॅक्टरी जुनी होऊन जाणार. मग प्रश्न येतो की जगामध्ये सर्वात आधी अत्याधुनिक तंत्रज्ञान तुम्ही तयार कराल अशी ताकद आहे का? मुळीच नाही. उलट, त्यांनी आणलेलं आणखी नवीन तंत्रज्ञान समजायचीसुद्धा ताकद नाही अशा पात्रतेचे आम्ही. म्हणजे आम्ही तंत्रज्ञानाच्या बाबतीत दिवसेंदिवस अधिक अडाणी होत जातो आहोत. प्रक्रियाशेती म्हणजे 'माजघर शेती' मध्ये याला वाव नाही.

पदार्थ कसा तयार करायचा? शँपेन चांगली म्हणजे कशी असतं? बटाट्याचा साधा एक चिप्, एक वेफर तयार करायचा तर तो चांगला कसा फुलतो, चांगला कसा रंगतो, चवीने चांगला कसा होतो याची जाणीव तयार करणाराला कशी झाली पाहिजे? हिंदुस्थानात एकच उदाहरण देण्यासारखं आहे. मोटारच्या गॅरेजमधला मिस्त्री या दृष्टीने आदरास अत्यंत पात्र असा माणूस आहे. त्याच्याकडे मूळचा पार्ट नसला तरी चालेल; 'उल्हासनगर'चा पार्ट नसला तरी चालेल; कोणतीही एखादी लोखंडाची नळी घेऊन, एखादी पट्टी घेऊन, बांधून तुमची गाडी पाचपंधरा किलोमीटरपर्यंत चालेल एवढी तरी व्यवस्था तो करू शकतो. याचं कारण, मोटारीच्या एंजिनची आणि त्याची दोस्ती झालेली असते. ही दोस्ती बटाट्याचा वेफर बनवणाऱ्या गृहिणीची आणि त्या वेफरची होऊ शकते. 'अल्फा लव्हाल'चं यंत्र आणून साखर तयार केली किंवा आईस्क्रीम तयार केलं किंवा शॅम्पेन तयार केली तर कारखानदाराची आणि त्या मालाची अशी दोस्ती होऊ शकत नाही. आणि ही जिथं दोस्ती होत नाही तिथं प्रक्रियाही यशस्वी होऊ शकत नाही. माजघर शेती म्हणून प्रक्रिया करतांना आम्ही काय विकणार आहोत? जॅम बनवून नाही विकणार. तुम्ही फ्रेंच मनुष्य 'क्रेप' तयार करतो म्हणून त्याचे क्रेप तयार करून त्याला विकायला जाल तर तो म्हणेल याला काही जमलं नाही फारसं. ते शक्यही होणार नाही. आपल्याकडेही काही पदार्थ आहेत. ते पदार्थ तयार केल्यानंतर त्यांची खुमारी जर आपण इतर देशातील लोकांच्या लक्षात आणून देऊ शकलो तर आपला माल आपण फार मोठ्या प्रमाणावर विकू शकतो. परवा फ्रान्समधले एक प्राध्यापक आले होते. त्यांना आम्ही बाजरीचे छोटे रोटले करून खाऊ घातले. ते म्हणाले, "अशा तऱ्हेचे रोटले, गरम गरम, जर जर्मनी आणि फ्रान्समध्ये मिळायची व्यवस्था झाली तर कोट्यावधी रुपयांचे बाजरीचे रोटले तिकडे विकता येतील." तुम्ही त्यांचा 'ब्रेड' त्यांना विकायचा प्रयत्न करू नका. तुमचा माल

तुम्ही तयार करायला हवा. मग हे कुठे जमेल? हे 'तात्यासाहेब कोऱ्यांच्या' कुवतीतलं नाही; हे 'डॉ. कूरियन' च्या कुवतीतलं नाही. हे तुमच्या आमच्या घरच्या 'सीतामायां'च्या कुवतीतलं काम आहे. म्हणून माजघरातली शेती असं त्याचं नाव आहे.

आणखी एक उदाहरण पाहण्यासारखं आहे. पुण्यामध्ये एका शहाण्या माणसानं पोळ्या तयार करण्याचा मोठा कारखाना काढला होता. रोज दोन लाख पोळ्या बनवायच्या. त्या त्यानं प्लॅस्टिकच्या पिशवीत घातल्या, दुकानात मांडल्या. गिऱ्हाईकीच्या हाती जाऊन, पिशवी उघडून खाईपर्यंत तीन दिवसाच्या त्या पोळ्या वातड झाल्या आणि तो कारखाना बंद पडला. याच्या उलट, डोंबिवलीला एक विधवा बाईनं डोंबिवली स्टेशनच्या बाहेर एक छोटीशी जागा घेऊन डब्यात ताज्या पोळ्या आणि ताजी भाजी घेऊन स्वतः उभी राहिली. लोकल गाडी पकडायला जे पुरुष जात त्यांच्यापैकी ज्यांना कुणाला घरून काही कारणानं डबा आणता आला नसेल त्यानं तिथं यायचं आणि त्या बाईकडून दोन तीन चपात्या आणि भाजीचटणी, लोणचं घ्यायचं आणि पैसे द्यायचे. दररोज सकाळी ताजी भाजी, ताजी चपाती मिळू शकते हे पाहिल्यानंतर मागणी इतकी वाढली की, आज डोंबिवली स्टेशनवर त्या जागी, त्या विधवा बाईने चालू केलेल्या कामाच्या तिथे चाळीस माणसं केवळ डबे भरण्यासाठी नोकरीला लागले आहेत. चुकीचं केंद्रीकरण केलं म्हणजे त्याचा पुण्याचा चपात्याचा कारखाना होतो. आपण उत्पादन करतांना चुकीचं केंद्रीकरण केलं तर तसंच खड्ड्यात जाऊ. समजा, आपल्याकडच्या एखाद्या गृहिणीला साबुदाणावडे चांगले बनवता येतात. तर तिनं असं ठरवलं की भरपूर साबुदाणावडे तयार करायचे, पिशव्यात भरायचे आणि चंडीगढला न्यायचे तर ते नाही जमणार. पण तिच्या साबुदाणावड्याचा एक 'फार्म्युला' आपण करू शकतो. बाईकाईने सूचना देऊन – त्यात साबुदाणा किती असला पाहिजे, बटाटे किती असले पाहिजेत, दाणे किती असले पाहिजेत, मीठ किती प्रमाणात – त्याप्रमाणे वडे बनविण्याच्या शक्यता वेगवेगळ्या ठिकाणी तयार केल्या आणि वेगवेगळ्या ठिकाणी ताजा माल पोहोचविण्याची व्यवस्था केली तर ती योजना बरोबर होईल.

याचा अर्थ काय? आम्ही काही 'तात्यासाहेब कोरे' किंवा 'डॉ. कूरियन'च्या मार्गाने जायला निघालो नाही. उलट, या आणि त्यांच्यासारख्या अनेक 'सम्राटां'नी दाखविलेल्या प्रक्रियेच्या सगळ्या मार्गांचा उच्छेद करण्याकरिता हा स्वतंत्र झालेला शेतकरी येतो आहे.

## व्यापाराचे वेगळे मार्ग

बाजारपेठ तयार करावी लागेल, व्यापार करावा लागेल. त्याचे वेगवेगळे मार्ग काढावे लागतील. आणि तुम्ही नाही काढलं तरीसुद्धा हे कुणीतरी काढणार आहे. या विषयावर निर्णय बैठकीत होत नाहीत. निर्णय घेणारे आपोआप निर्णय घेणार आहेत.

प्रक्रियांकरिता जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये 'प्रायव्हेट लिमिटेड कंपनी' काढणे हेच आता स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने संयुक्तिक ठरते. सहकारी संस्था नको. नावालासुद्धा सहकारी नको. त्या नावाने सरकारकडून भांडवल उभारण्यात मदत होत असली तरीसुद्धा ती आम्हाला नको. माणूस म्हणून जगण्याचा जो अधिकार आम्ही मिळवला तो भांडवलनिर्मितीमधला थोडासा फायदा सरकारकडून मिळवण्यापोटी विकण्याकरिता नाही. त्याचा जो काही तोटा आहे तो आम्ही सहन करू. शेवटी, व्यापारी फायदा काढतात त्यांना तर काही सहकारी भांडवल निर्मितीमधली मदत मिळत नाही ना? तरी ते फायद्याने व्यापार करतात ना? आणि सहकारी संस्थांना भांडवलनिर्मितीतील मदत मिळूनसुद्धा सगळ्या सहकारी संस्था तोट्यातच चालल्यात ना? मग कशाकरता त्या फासात आपला गळा अडकवायचा? प्रक्रियेकरता जिल्हावार 'प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या' काढता येतील, व्यापाराकरिताही तशा कंपन्या काढता येतील. सुरुवातीला दहा दहा हजार रुपये देणारी पन्नास माणसे जरी प्रत्येक जिल्ह्यात उभी राहिली तरी काम सुरू होऊ शकेल. त्याच्या पुढचं भांडवल त्यात जो फायदा होईल त्यातून उभं करता येईल. आणि सगळ्या महाराष्ट्रातल्या या 'प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यां'ची मिळून एक मोठी 'पब्लिक लिमिटेड कंपनी' सुद्धा तयार करता येईल.

शेतकरी संघटनेच्या आर्थिक कार्यक्रमावर शेतकऱ्यांचा प्रचंड विश्वास आहे. ते तुम्हाला मतं देत नसतील, मतं देण्याचा त्यांचा हिशोब वेगळा आहे. पण तुम्ही जर सांगितलं की शेतकऱ्यांनी त्यांना जे काही खरेदी करायला लागत असेल – मीठमिरची, कापडचोपड – ते शेतकऱ्यांच्या दुकानांतूनच खरेदी करावं, आणि त्यांना जो माल विकायचा तो शेतकरी संघटनेच्या माजघर शेती, व्यापार शेती, निर्यात शेती या मार्गातून विकला तर त्यांचा फायदा मिळणार आहे आणि हे जर एकदा शेतकऱ्यांना स्पष्ट झालं तर शेतकऱ्यांच्या सद्भावना तुमच्याइतक्या दुसऱ्या कुणाच्याही पाठीशी असणार नाहीत. याचा फायदा घ्यायचा किंवा नाही हे आता स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांनी ठरवायचे आहे.

## बदलाची संधी प्रथमच आली

याचा अर्थ असा नाही की आता शेतकरी संघटना जिल्ह्याजिल्ह्यात 'पब्लिक लिमिटेड कंपन्या' उघडणार. असा गैरसमज कुणाचा होऊ नये. शेतकरी संघटना ही कधीही व्यापारी संघटना होणार नाही. शेतकरी संघटना ही आंदोलक संघटनाच आहे. आम्ही शेतकऱ्यांना सांगतो आहोत की तुम्ही स्वतंत्र झाला आहात; आता, जन्मतः स्वतंत्र असतात तर जे केलं असतं तेच करायला लागा. आणि जर आमच्या असं लक्षांत आलं की या स्वातंत्र्यावर पुन्हा कुणी गिधाडं घाला घालीत आहेत – मग ती जातीयवादी असोत का बिगर जातीयवादी असोत – त्या नाठाळांच्या माथी काठी घालणं हेच शेतकरी संघटनेचं काम आहे. पण शेतकरी संघटनेचा जो पाईक, जो आधार तो शेतकरी आता निव्वळ रुमणं घेऊन, बैलासारखी जुवाच्याखाली मान घालून जर चालत राहिला तर त्याची लढाई आता जिंकली जाऊ शकत नाही. आता तुमच्या पायाच्या पट्ट्या काढणं अपरिहार्य आहे. तुम्हाला पायावर उभं राहाणं अपरिहार्य आहे. तुमच्या पायात रक्त खेळू लागल्यानंतर असह्य वेदना होणार आहेत. पण, माणूस म्हणून जगण्याची या वेदना ही किंमत आहे.

शेगावच्या जाहिरनाम्यातील चतुरंग शेतीच्या कार्यक्रमाचा सविस्तर अर्थ असा आहे. स्वतंत्र झालेला शेतकरी आता आपल्या प्रश्नाची उकल कशी करील हे आज कोणालाही नक्की सांगणे कठीण आहे. पण ती तो कशी करू शकेल यासाठी सीताशेती, माजघर शेती, व्यापार शेती आणि निर्यात शेती या चार प्रयोगशाळा आहेत. आपल्याला धडपडत चालावं लागणार आहे. काही वेळा आपण पडू, काही वेळा चुका करू, कदाचित् खोट खाऊन घरी बसण्याचीसुद्धा वेळ येईल. दिवाळखोर तर तसे आपण गुलामगिरीतही झालो होतो. दिवाळखोरच व्हायचं नशिबी असेल तर स्वातंत्र्यातील दिवाळखोरीचा अनुभव घ्यायला तुम्हाला मिळणार आहे एवढाच खरा शेगावच्या जाहिरनाम्याचा अर्थ आहे.

आपल्याला शेतकऱ्यांचं आपल्या मनातलं चित्र पालटणं आवश्यक आहे. जर का शेतकऱ्यांची दुश्मनी करणारं सरकार नसतं तर आपण आज ज्या प्रकारचे शेतकरी झालो आहोत, कुणबाऊ शेतकरी, तसे राहिलो नसतो. इथं कुणबाऊ हा जातिवाचक शब्द म्हणून वापरला नाही तर मराठी शब्दकोशातील त्याचा अर्थ माझ्या मनात आहे. आपण सीताशेती करणारे, माजघरामध्ये प्रक्रिया घडवून आणणारे, व्यापार करणारे, निर्यात करणारे शेतकरी एरवीही बनलो असतो. हजार दोन हजार वर्षे आपली फुकट गेली, नवीन हजार दोन हजार वर्षे आणखी कोणाच्यातरी जोखडाखाली मान घालून आम्ही फुकट घालविणार नाही, स्वतंत्र रस्ता शोधून आमच्या त्या स्वतंत्र रस्त्याने जाणार आहोत हा खरा शेगावच्या जाहिरनाम्याचा अर्थ आहे.

●●●

### महिला अधिवेशने व जिल्हा कार्यकर्त्यांच्या व्यापक बैठकांसाठी

# श्री. शरद जोशी यांचा महाराष्ट्रव्यापी दौरा

१५, १६, १७ डिसेंबर १९९१ रोजी वर्धा येथे शेतकरी संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत तयार झालेल्या नवीन कार्यकारिणीने 'शेगाव जाहीरनाम्या'तील भारत दशकाचा कार्यक्रम जोमाने राबविण्याचा निर्णय घेतला. तसेच, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या येत्या निवडणुकीत महिलांच्या सर्वच्या सर्व जागा लढविण्याच्या शेतकरी महिला आघाडीच्या निर्णयास पाठिंबा देऊन त्या अनुषंगाने तयारीच्या कामास लागण्याचे ठरविले.

त्यासाठी जिल्ह्याजिल्ह्यात महिला अधिवेशने, महिलांनी 'माजघर शेती'ची सुरुवात म्हणून घरी बनविलेल्या पदार्थांची प्रदर्शने, जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या व्यापक बैठका अशा त्रिविध उद्देशाने श्री. शरद जोशी यांचा महाराष्ट्रभराचा दौरा ५ जानेवारी ९२ ते १ फेब्रुवारी ९२ या कालावधीसाठी आखला आहे. २१ जानेवारीपासून इतर कार्यक्रमांबरोबर शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा कार्यक्रमही या दौऱ्यात घेतला जाईल. हा दौरा पुढीलप्रमाणे असेल.

५ जानेवारी – नागपूर
६ जानेवारी – चंद्रपूर
७ जानेवारी – वर्धा
८ जानेवारी – यवतमाळ
९ जानेवारी – अमरावती
१० जानेवारी – अकोला
११ जानेवारी – बुलढाणा
१२ जानेवारी – जालना
२१ जानेवारी – सोलापूर
२२ जानेवारी – अहमदनगर
२३ जानेवारी – नाशिक
२४ जानेवारी – धुळे
२५ जानेवारी – जळगाव
२६ जानेवारी – औरंगाबाद
२७ जानेवारी – अंबेजोगाई
२८/२९ जानेवारी – लातूर
३० जानेवारी – नांदेड
३१ जाने./१ फेब्रु. – परभणी

## लक्ष्मीमुक्ती व निवडणूकप्रचार

वरील दौरा आटोपल्यानंतर जो भाग निवडणूक प्रचाराच्या कार्यक्रमाशिवाय राहिला आहे त्या भागात श्री. शरद जोशी पुन्हा दौरा करून निवडक ठिकाणी लक्ष्मीमुक्ती ग्रामगौरव समारंभ व शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करतील. हा दौरा पुढीलप्रमाणे असेल.

२/३ फेबुवारी – बुलढाणा
४ फेब्रुवारी – अकोला
५/६ फेब्रुवारी – अमरावती
७ फेब्रुवारी – यवतमाळ
८ फेब्रुवारी – वर्धा
९ फेब्रुवारी – चंद्रपूर
१० फेब्रुवारी – नागपूर

●●●

# शेतकरी संघटना : प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक

## वर्धा दि. १५/१६/१७ डिसेंबर १९९१

# शेतकरी महिला आघाडी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका लढविणार

# शेतकऱ्यांच्या व्यवसायस्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या सरकारी धोरणांचा निषेध

# शेतकरी संघटना कार्यकारिणीची नवीन रचना जाहीर

शेतकरी संघटनेच्या 'शेगावच्या जाहिरनाम्या'तील कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सोयीस्कर व्हावे म्हणून शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीचा ढाचा बदलून तिची नवीन रचना करता यावी यासाठी संघटनेचे अध्यक्ष श्री. किशोर माथनकर व शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सुमनताई अग्रवाल यांनी वर्धा येथे संघटनेच्या महाराष्ट्रभरच्या प्रमुख कार्यकर्त्यांना १५, १६ व १७ डिसेंबर १९९१ रोजी वर्धा येथे बैठकीसाठी निमंत्रित केले होते. कार्यकारिणीच्या रचनेखेरीज कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची दिशा ठरविणे, शेतकरी महिला आघाडीच्या पंचायत राज्य निवडणुकांमध्ये महिलांच्या सर्व जागा लढविण्याच्या निर्णयावर विचार करणे हेही विषय या बैठकीपुढे ठेवण्यात आले होते.

पहिले दोन दिवस महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून सुमारे ६० कार्यकर्ते हजर होते. त्यांनी शेतकरी संघटनेच्या 'भारत दशका'तील चतुरंग शेती या कार्यक्रमावर श्री. शरद जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सविस्तर चर्चा केली. या बैठकीत शेतीमालाबाबतीत सरकारच्या सध्याच्या भूमिकेचाही आढावा घेण्यात आला. तसेच, पंचायत राज्यातील महिलांच्या सर्व जागा लढविण्याच्या शेतकरी महिला आघाडीच्या निर्णयाचेही विश्लेषण करण्यात आले.

१७ डिसेंबर रोजी या बैठकीला उपस्थितांची संख्या सुमारे २०० च्या आसपास पोहोचली. या बैठकीत चतुरंग शेतीतील सीताशेती, माजघर शेती, व्यापार शेती व निर्यात शेती या विषयांची मांडणी अनुक्रमे सौ. सरोज काशीकर, श्री. विजय जावंधिया, श्री. रवि काशीकर व गोविंद जोशी यांनी केली. त्यांनी केलेल्या मांडणीच्या अनुषंगाने उपस्थित कार्यकर्त्यांनी चर्चा केली. या चर्चेच्या शेवटी श्री. शरद जोशी यांनी शेगावच्या जाहिरनाम्यातील चतुरंग शेतीचा अर्थ मुद्देसूदपणे उलगडून दाखविला.

बैठकीत शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सुमनताई अग्रवाल यांनी रावेरी येथील 'स्वयंसिद्धा सीतामंदिर' उभारणीचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावावर भाषण करतांना हे मंदिर कसे असावे यासंबंधीच्या कल्पना कळविण्याचे आवाहन श्री. शरद जोशी यांनी केले.

श्री. भास्करराव बोरावके यांनी शेतकरी महिला आघाडीतर्फे पंचायत राज्यातील महिलांच्या सर्वच्या सर्व जागा लढविण्याचा ठराव मांडला. या ठरावावरही विस्ताराने चर्चा झाली.

देश आर्थिक समस्येत अडकला असतांना आणि या आर्थिक समस्येतून शेतकरीच देशाला वाचवू शकतो याची खात्री पटलेली असतांनासुद्धा शासन अजूनही शेतकरी विरोधी धोरणे राबविण्याची धडपड करते आहे. याबद्दल या बैठकीत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

डॉ. वसंतराव बोंडे यांनी शासन शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या किंमतविषयक जी धोरणे राबवीत आहे व शेतकऱ्यांच्या व्यवसायस्वातंत्र्यावर घाला घालीत आहे याबद्दल तीव्र निषेध व्यक्त करणारा व त्याविरुद्ध आंदोलनाचा इशारा देणारा ठराव मांडला.

शेवटी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. किशोर माथनकर यांनी आपल्या कार्यकारिणीची घोषणा केली. या कार्यकारिणीचे अध्यक्षीय मंडळ, कृतिसमिती, अध्यक्षनियुक्त सदस्य मंडळ व जिल्हा प्रमुख असे चार उपविभाग असतील.

### ठराव : आंदोलनाचा इशारा

यंदाच्या दुष्काळाच्या वर्षी, नापीकी सर्वदूर झाली असता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील वाढत्या भावांचाही फायदा शेतकऱ्यांना मिळू नये असे प्रयत्न शासनातर्फे होत आहेत.

कापूस, ऊस, धान, दूध या शेतीमालांच्या बाबतीत शासनाच्या अशा धोरणाबाबत शेगाव मेळाव्यात निषेध करण्यात आला होता.

त्यानंतर महाराष्ट्र सरकारने १५ टक्क्यांनी कापसाचा अग्रीम बोनस वाढविण्याची घोषणा करून शेतकऱ्याच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रयत्न केला आहे. आजही महाराष्ट्रातले भाव ३०० ते ४०० रुपये प्रतिक्विंटल कमी आहेत. अन्यायकारक कपाती रद्द न करण्याची स्पष्ट घोषणा करून शेतकरीविरोधी धोरण शासनाने स्पष्ट केले आहे. शेतकरी संघटना या धोरणाचा निषेध करते.

शेतकऱ्याच्या व्यवसायस्वातंत्र्यावर लादल्या जाणाऱ्या बंधनांविरुद्ध एक व्यापक आंदोलन जिल्हा परिषद निवडणुकांनंतर तातडीने घेण्यासाठी शेतकऱ्यांनी सज्ज राहावे असा शेतकरी संघटना आदेश देते.

### ठराव : जिल्हा परिषद व पंचायत राज्य निवडणुका शेतकरी महिला आघाडी लढविणार

महाराष्ट्रात जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका तेरा वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर आता १२ फेब्रुवारी १९९२ रोजी घेण्याचे जाहीर झाले

आहे.

राजकारणातील गुंडगिरीचे प्रस्थ मोडून काढणे व पंचायत राज्य संस्थांमध्ये खऱ्याखुऱ्या अर्थाने विकास कार्याची सुरुवात करणे ही दोन उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून शेतकरी महिला आघाडी आणि शेतकरी संघटनेने नोव्हेंबर १९८६ मध्ये चांदवड महिला अधिवेशनात या संस्था स्त्रियांचे ताब्यात घेण्याचे ठरवले.

'टग्यांचे राज्य' संपवून 'आयाबहिणींचे राज्य' स्थापन करण्याच्या या निर्धारपूर्वक घोषणेचा परिणाम म्हणून या संस्थांच्या निवडणुका गेली पांच वर्षे सातत्याने पुढे पुढे ढकलण्यात आल्या. पण शेतकरी महिला आघाडी आणि शेतकरी संघटनेने आपला निर्धार सोडला नाही. आधीची मुदतबाह्य मंडळे बरखास्त होऊन तेथे प्रशासक नेमले जावे व निवडणुका त्वरीत घेतल्या जाव्या यासाठी शेतकरी महिला आघाडीने शेतकरी संघटनेच्या सहकार्याने आंदोलने केली.

परिणामतः, १९९० साली शासनाने महिलांसाठी ३०% जागा पंचायत राज्य संस्थांमधे राखीव करण्याचा निर्णय घेतला. हा एका अर्थाने शेतकरी महिला आघाडीने घेतलेल्या भूमिकेचा विजय आहे. ३०% जागा महिलांकरिता राखीव ठेवण्याची संकल्पना महिला आघाडीला नापसंत असून ह्या जागा निश्चित करण्याच्या पद्धतीलाही विरोध आहे. तरीही सुरुवात म्हणून ह्या ३०% जागा लढविण्याचा महिला आघाडीचा २४ सप्टेंबर १९९० रोजी पुणे येथे झालेल्या बैठकीत घेतलेला निर्णय कायम आहे.

बिगर राखीव सर्वसाधारण मतदार संघातील विशेष समर्थक महिला उमेदवारांना मतदार संघ राखीव नाही याच कारणास्तव निवडणुकीत सहभाग दुष्कर होत असेल तर अशा मतदार संघातही शेतकरी महिला आघाडी आपला उमेदवार उभा करेल.

ह्या निवडणुकांमध्ये शेतकरी संघटना सर्व शक्तिनिशी महिला आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी साहाय्य करेल.

●●●

# जिल्हा परिषद निवडणुका
## शेतकरी महिला आघाडीची उमेदवार यादी बनविण्यासाठी कृतिसमितीचा दौरा

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीतील कृतिसमितीचे चार निरीक्षक गट महाराष्ट्राच्या जिल्ह्यांचा दौरा करून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या येत्या निवडणुकांत शेतकरी महिला आघाडीमार्फत भाग घेण्याच्या दृष्टीने पाहाणी करून इच्छुक महिला उमेदवारांची एक प्राथमिक यादी तयार करणार आहेत.

**निरीक्षक गट १** : श्री. किशोर माथनकर, ॲड. वामनराव चटप, श्री. विजय जावंधिया, सौ. सरोज काशिकर आणि सौ. सुमनताई अग्रवाल

**निरीक्षक गट २** : श्री. शंकर धोंडगे, श्री. शिवराज तोंडचिरकर, सौ. सुमन त्र्यंबकराव पवार

**निरीक्षक गट ३** : श्री. बद्रीनाथ देवकर, श्री. मोहन गुंजाळ, सौ. स्मिता गुरव

**निरीक्षक गट ४** : श्री. भास्करराव बोरावके, श्री. जयपाल फराटे, चेतना गाला

**दौऱ्याचा कार्यक्रम**

| दिनांक | निरीक्षक गट क्रमांक | | | |
|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ |
| २५ डिसेंबर ९१ | चंद्रपूर | नांदेड | नगर | – |
| २६ डिसेंबर ९१ | वर्धा | परभणी | नाशिक | सोलापूर |
| २७ डिसेंबर ९१ | यवतमाळ | जालना | धुळे | सातारा |
| २८ डिसेंबर ९१ | अमरावती | औरंगाबाद | जळगाव | सांगली |
| २९ डिसेंबर ९१ | वाशिम | अंबेजोगाई | – | कोल्हापूर |
| ३० डिसेंबर ९१ | अकोला | लातूर | – | पुणे |
| ३१ डिसेंबर ९१ | बुलढाणा + नागपूर | उस्मानाबाद | – | – |

# भीक नको, घेऊ घामाचे दाम

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक, फेब्रुवारी १९९२

# शेतकरी महिला आघाडीचा जाहिरनामा

महाराष्ट्रात जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका दिनांक १२ फेब्रुवारी १९९२ रोजी घडवून आणण्याचे अखेरीस महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मान्य केले. या निवडणुका पाच वर्षांपूर्वीच म्हणजे फेब्रुवारी १९८७ मध्येच व्हायचे ठरले होते. पण, नोव्हेंबर १९८६ मध्ये चांदवड अधिवेशनात शेतकरी महिला आघाडीने या निवडणुका लढविण्याचे घोषित केले आणि त्यानंतर आजपर्यंत या निवडणुका घेण्याचे धाडस शासनाला झाले नव्हते.

होऊ घातलेल्या निवडणुकीत ३० टक्के जागा महिलांकरिता राखून ठेवण्याचे शासनाने मान्य केले आहे; त्यामुळे महिला आंदोलनाच्या शिडातील हवा काढून घेतल्यासारखे होईल अशी शासनाची कल्पना आहे.

राखीव जागा ठरविण्याची पद्धत शासनाने अशा कपटाने ठरवली आहे की त्यामुळे खऱ्याखुऱ्या महिला आंदोलनाचे नुकसानच व्हावे. कोणत्याही राजकीय पक्षास स्त्रियांचे खरेखुरे प्रतिनिधी निवडून आणण्यात अजिबात स्वारस्य नाही. जेथे जेथे मतदारसंघ स्त्रियांकरिता राखीव असेल तेथे तेथे प्रस्थापित पुढाऱ्यांच्या घरातीलच एखाद्या महिलेला उभे केले म्हणजे भागेल असे आडाखे ते मनाशी बांधीत आहेत.

स्त्रियांसाठी जागा राखीव ठेवल्याने एक मोठी संधी ग्रामीण भागातील महिलांसमोर चालून आली आहे. ही संधी हातची जाणार नाही आणि ग्रामीण महिलांच्या समस्यांची जाण असलेले महिलांचे खरेखुरे प्रतिनिधीच जिल्हा परिषदेत व पंचायत समितीत जातील याची खात्री करून घेतली पाहिजे.

**महाराष्ट्रभरच्या ग्रामीण महिलांचे सर्वंकष प्रतिनिधित्व करणारी एकमेव संघटना म्हणजे शेतकरी महिला आघाडी.**

★ शेतकरी महिला आघाडी म्हणजे जात-पात, धर्म-पंथ, भाषा-प्रांत या भेदांपलीकडे जाऊन केलेली शेतकरी महिलांची एकजूट आहे. १० नोव्हेंबर १९८६ रोजी चांदवड येथे भरलेल्या महिला अधिवेशनात जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका लढवून त्या ताब्यात घेण्याची घोषणा केली गेली. या निर्णयाला शेतकरी संघटना तसेच इतर शेतकरी कष्टकऱ्यांच्या अनेक संस्थांनी संपूर्ण पाठिंबा व्यक्त केला.

★ शेकडो वर्षे पाशवी बळाच्या आधारे उत्पादक श्रमाचे फळ हिरावून घेतले गेले. हिंसाचार केला गेला. ह्यात खऱ्या हरल्या सगळ्या स्त्रिया. समाजातील असुरक्षिततेमुळे स्त्रियांना घरात गाडून घ्यावे लागले. घरातील अत्याचारही

त्यांना निमूटपणे सोसावे लागले.

★ स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गेल्या चव्वेचाळीस वर्षात शोषण अधिकच उग्र झाले. काळ्या साहेबांच्या शहरी राज्यामध्ये गावखेड्यात पुढारी गुंडांचे आणि शहरांत पुढारी दादांचे साम्राज्य चालू झाले.

★ सहकारी संस्था, कारखाने, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या ग्रामीण गुंडांचे अड्डे बनले.

★ स्त्रियांना निर्भयपणे जगता यावे म्हणून शेतकरी महिला आघाडीने गुंडांचे बालेकिल्ले बनलेल्या पंचायत राज्य संस्थांमध्ये शिरकाव करून त्या गुंडांचे पारिपत्य करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे.

★ पंचायत राज्य स्त्रियांनी हाती घेतल्याने ग्रामीण भागातील स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढेल. आयाबहिणींची प्रतिष्ठा वाढेल. मुख्य म्हणजे विकासाच्या कार्यक्रमांकडे स्त्रियांच्या नजरेतून पाहिजे जाईल. स्त्रियांचे आरोग्य, कुपोषण, गावासाठी पाण्याची सोय, स्वच्छता ह्या सर्व कार्यक्रमांना अग्रक्रम लाभेल. आज नुसता भ्रष्टाचार आणि स्वार्थ यांचे थैमान माजले आहे. त्याला आळा बसून खऱ्या अर्थाने विकासाचे कार्यक्रम हाती घेतले जातील. त्यात अडचणी येतील तेव्हा शासनावर दबावही आणता येईल.

★ विटनेर (जळगाव), येणोरा (वर्धा), मेटीखेडा (यवतमाळ), सालोड कसबा (अमरावती) इत्यादी ग्रामपंचायती ताब्यात घेऊन शेतकरी महिला आघाडीने त्या त्या गावांमध्ये खऱ्याखुऱ्या अर्थाने विकास कार्यक्रम राबवायला सुरुवात करून आपल्या कामाचे उदाहरण पुढे ठेवले आहे.

★ गावगुंडांच्या साम्राज्याचा पाया उखडणे आणि गावागावात निर्भय वातावरण निर्माण करणे हे महत्त्वाचे काम शेतकरी महिला आघाडी पार पाडणार आहे.

१९८६ सालापासून ग्रामीण महिलांसाठी शेतकरी महिला आघाडीने दारू दुकान बंदी व लक्ष्मीमुक्ती हे कार्यक्रमही जोमाने चालवले आहेत. लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमात घरच्या माणसांनी लक्षावधी शेतकरी महिलांना स्वतःच्या नावे जमीन स्वखुशीने करून दिली आहे.

स्त्रियांना जमिनीवर मालकी देण्यापलिकडे सीतोशेती व माजघरातील प्रक्रिया शेती अशा कार्यक्रमांमुळे शेतकरी स्त्रियांना स्वयंसिद्धा बनविण्याचा व्यापक कार्यक्रम आखण्यात आला आहे.

स्वयंसिद्धा स्त्रियांचे अभिमानस्थळ प्रतिक म्हणून यवतमाळ जिल्ह्यातील रावेरी येथे सीतेचे मंदिर बांधण्याचा संकल्पही शेतकरी महिला आघाडीने केला आहे.

शेतकरी महिला आघाडी पुढील विकास कार्यक्रम अग्रक्रमाने राबवील –

(१) स्त्रियांना मालमत्ता व मिळकत यावरील मालकीत व्यापक सहभाग मिळवून देणे.

(२) गावागावातील दारूची दुकाने पंचायतींवर ठराव करून बंद करवणे.

(३) पाणी पुरवठा, तलाव, धरणे यांच्या योजना तयार केल्या गेल्या त्या कारखान्यांना, शेतीला पाणी पुरविण्याकरिता, मोठ्या योजनांच्या कंत्राटाच्या पैशाचा फायदा घेण्याकरिता आणि राजकीय डावांच्या खेळी खेळण्याकरिता. केवळ पिण्याचे पाणी भरण्याकरिता दररोज मैलोगणती चालून डोक्यावर हंड्यांच्या उतरंडी घेऊन तासन् तास राबणाऱ्या स्त्रियांना काय पाहिजे आहे याचा विचार कोणी केला नाही. तो कार्यक्रम शेतकरी महिला आघाडी हाती घेईल.

(४) आरोग्याच्या योजनांसारखे प्रकल्प आखले गेले, त्यातही बहुराष्ट्रीय औषध कंपन्यांची सोय पाहिली गेली, सरकारी नोकरांच्या बढतीचा प्रश्न महत्त्वाचा मानला गेला. कोट्यावधी स्त्रियांना मात्र आजही कुपाटी वापरावी लागते. आयांची आणि त्यांच्या मुलाबाळांची आबाळच होते आहे. आरोग्याच्या ग्रामीण गरजा लक्षात घेऊन स्वस्त, उपयुक्त औषधपाण्याची सोय करण्याचा कार्यक्रम हाती घेतला जाईल.

(५) इंधन आणि ऊर्जेचे प्रकल्प परदेशी आणि स्वदेशी तंत्रज्ञान व कारखानदारांच्या फायद्याकरिता झाले. संध्याकाळच्या वेळी चुलीत जाळण्यासाठी काटेवाटेने काटक्याकुटक्या जमा करीत चालणाऱ्या स्त्रीचा विचार झालाच नाही. गावातल्या प्रत्येक चुलीला पुरेसे इंधन मिळेल ह्यासाठी शेतकरी महिला आघाडी वेगवेगळे कार्यक्रम हाती घेण्याचा प्रयत्न करेल.

(६) रोजगाराच्या योजनांच्या नावाने खड्डे खणणे, खडी फोडणे असली कामे बायांच्या वाट्याला येतात. धुळ्याच्या अक्काबाई राजपूतप्रमाणे प्रसूतिवेदनांच्या शेवटच्या क्षणापर्यंत खडी फोडण्याचे काम कोणाच्याही नशिबी येऊ देणार नाही असा शेतकरी महिला आघाडीचा निर्धार आहे.

(७) पंचायत राज्याच्या संस्था महाराष्ट्रभर ताब्यात घेऊन एक किमान कार्यक्रम शेतकरी महिला आघाडीने निश्चित केला आहे. या संस्थांना शासनाच्या आर्थिक गुलामगिरीतून सोडविले तरच हा कार्यक्रम प्रत्यक्षात येऊ शकेल. त्यासाठी या संस्थांची स्वतःची आर्थिक ताकद वाढविण्याच्या योजनाही हाती घेतल्या जातील.

थोडक्यात, येत्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत शेतकरी महिला आघाडीचा कार्यक्रम आहे –

**स्त्रीचा सन्मान, लक्ष्मीमुक्ती, दारुदुकानबंदी आणि पाणी, औषध, जळण आणि रोजगार यांची महिलाप्रधान व्यवस्था.**

●●●

# शेतकरी संघटना कार्यकारिणीची नवीन रचना

**(१) अध्यक्ष :**
किशोर माथनकर (वर्धा)
**(२) शेतकरी महिला आघाडी अध्यक्षा :**
सौ. सुमनताई अग्रवाल
**(३) अध्यक्षीय मंडळ :**
**अध्यक्ष :** विजय जावंधिया
रामचंद्र बापू पाटील
भास्करराव बोरावके
शंकर धोंडगे
सौ. विमलकाकू पाटील
**(४) कृतीसमिती :**
**अध्यक्ष :** शंकर धोंडगे
(१) पाशा पटेल
(२) विठ्ठलदादा भंडखाड
(३) दत्ता पवार
(४) अनंत देशपांडे
(५) दत्तराव नाईक
(६) गोविंद जोशी
(७) लक्ष्मण वंगे
(८) हेमंत देशमुख
(९) मोहन गुंजाळ
(१०) बद्रीनाथ देवकर
(११) दत्ता भोसले
(१२) राम नेवले
(१३) वामन जाधव
(१४) किशन शेवाळे
(१५) विजय कडू
(१६) श्रीकांत तराळ
(१७) सौ. संध्या इंगोले
(१८) सौ. रेखा अपराजीत
(१९) सौ. विमल आकनगिरे
(२०) सौ. ज्योती खोंडे
(२१) आमदार मोरेश्वर टेमुर्डे
(२२) आमदार वामनराव चटप
(२३) आमदार सौ. सरोज काशीकर
(२४) आमदार डॉ. वसंत बोंडे
(२५) आमदार शिवराज तोंडचिरकर

**अध्यक्ष नियुक्त सदस्य मंडळ**
(१) श्रीरंग नाना मोरे
(२) रवि काशीकर
(३) गिरीष सहस्त्रबुद्धे
(४) चंद्रकांत वानखेडे
(५) सुधाकर जाधव
(६) नामदेव फटींग
(७) आनंदराव पाटील
(८) बाबासाहेब देशमुख
(९) धुंडीराज नेरलकर
(१०) शंकर वरणे
(११) गुलाबराव राठी
(१२) ॲड. उमरीकर
(१३) ब. ल. तामसकर
(१४) डॉ. अशोक पातूरकर
(१५) भाऊसाहेब शिवणीकर
(१६) सुधाकर देशमुख
(१७) शिवाजीराव नदीवाडीकर
(१८) बापूराव महाराज परतूरकर
(१९) सुभाष चव्हाण
(२०) व्ही. एस्. विश्वेकर
(२१) विश्वास हाऊळ
(२२) वसंतराव आपटे
(२३) जयपाल फराटे
(२४) बाबूराव मगदूम
(२५) आदम मुजावर
(२६) अजीत नरदे
(२७) खंडेराव घाडगे
(२८) विजय काटकर
(२९) नरेंद्र अहिरे
(३०) राजेंद्र ढोकले
(३१) वसंतअप्पा चौधरी
(३२) सखारामभाई पाटील
(३३) चिमणदादा पाटील
(३४) बाबुभाई जैन
(३५) अरुण दातार
(३६) प्रकाश पोहरे
(३७) गोपाळराव परांजपे
(३८) शाम पवार
(३९) सुभाष चोळके
(४०) बाळसाहेब शिंदे
(४१) दशरथ सावंत
(४२) दिलीप काळमेघ
(४३) माणिक म्हशाखेत्री
(४४) सुरेश धावेकर

**शेतकरी महिला आघाडी**
**कृतिसमिती**
(१) **अध्यक्षा :** सौ. सुमनताई अग्रवाल
(२) सौ. विमलताई पाटील
(३) सौ. आशा तरार
(४) सौ. चेतना गाला
(५) सौ. संध्याताई इंगोले
(६) सौ. सुमनताई पवार
(७) सौ. कासाबाई काळवाघे
(८) सौ. शैलाताई देशपांडे
(९) सौ. सुहासिनी वानखेडे
(१०) सौ. रत्नाबाई अस्वले
(११) सौ. स्मिता गुरव
(१२) सौ. गेल ऑमव्हेट

**जिल्हा प्रमुखांची यादी**
(१) नागपूर – श्री. मदन कामडे
(२) चंद्रपूर – श्री. ॲड. मोरांडे
(३) भंडारा – श्री. फेकन भोलानाथ चौधरी
(४) वर्धा – श्री. नंदकिशोर काळे
(५) यवतमाळ – १) श्री. जयंत बापट
(पुसद) २) श्री. नितीन देशमुख
(६) अमरावती – श्री. संजय कोलते
(७) बुलढाणा – श्री. नामदेवराव जाधव
(८) अकोला – श्री. ललीत बहाळे
(९) वाशिम – श्री. डॉ. दामोधर काळे
(१०) नांदेड – श्री. शिवाजीराव वाघ
(११) परभणी – श्री. माणिकराव पवार
हिंगोली – श्री. उत्तमराव वाबळे
(१२) जालना – श्री. बापूराव महाराज परतूरकर
(१३) औरंगाबाद – श्री. गोरख सोनावणे
(१४) बिड – १) श्री. गंगाधर गायकवाड
२) श्री. अच्यूत गंगणे
(१५) लातूर – श्री. बाबूराव हाडोळे
(१६) उस्मानाबाद – श्री. ॲड. नेताजी गरड
(१७) सोलापूर – श्री. शिवानंद दरेकर
(१८) सातारा – श्री. गुलाबराव सणस
(१९) सांगली – श्री. रघुनाथ पाटील

**(पान १६ पहा)**

## ‘स्वयंसिद्धा सीता’ मंदिर संकल्पाच्या निमित्ताने
# सीतामाईच्या दुसऱ्या वनवासाची कहाणी – २

शेतकरी संघटकच्या ६ डिसेंबर १९९१ च्या अंकात श्री वाल्मिकी रामायणातील काही सर्ग आपण वाचले. रावणाच्या वधानंतर झालेली रामसीता भेट आणि त्यानंतर प्रभु रामचंद्र आणि सीतामाई यांच्यातील संवादाने प्रभु रामचंद्राचा प्रिय बंधु लक्ष्मण यालासुद्धा दुःख झाले. तरीही वडील बंधूंच्या आज्ञेचे पालन म्हणून त्याने सीतेसाठी चिता रचली.

श्री वाल्मिकी रामायणात त्या चितेला अग्नि कुणी दिला याचा उल्लेख नाही. पण सीतामाईने आधी आपल्या पतीला प्रदक्षिणा घालून नंतर देवाब्राह्मणांना प्रणाम करून त्या प्रज्वलित अग्निसमोर उभं राहून आपण निष्कलंक असल्याचे जाहिर केले आणि आपण खरेच निष्कलंक असू तर अग्निदेवाने आपले संरक्षण करावे अशी विनंती करून त्या धगधगत्या चितेत प्रवेश केला. हा सर्व ‘सोहळा’ पहायला सर्व सैन्य तर होतेच पण सर्व देव; ऋषिसुद्धा उपस्थित झाले होते. सीतेने चितेत प्रवेश केल्यानंतर मग जगताच्या श्रेष्ठ ब्रह्मवेत्त्यातील श्रेष्ठ ब्रह्मदेवांनी श्रीरामाला त्याची महती वर्णन करून सांगितली. आणि “...... एका साधारण माणसाप्रमाणं तुम्ही सीतेची उपेक्षा का करता?’ असा प्रश्न विचारला.

तेव्हा ‘मी स्वतःला मनुष्यमात्र’च समजतो असे म्हणून श्रीरामांनी आपण कोण आहोत, कोठून आलो आहोत याची माहिती देण्याची विनंती ब्रह्मदेवांना केली.

श्रीरामांच्या विनंतीला मान देऊन ब्रह्मदेवांनी श्रीरामांच्या खऱ्या स्वरूपाविषयी माहिती सांगितली – ज्याला श्रीवाल्मिकींनी दिव्यस्तोत्रकथा म्हणजे पुरातनस्वरूपाचा इतिहास असे संबोधून या कथेचे कीर्तन करतील त्यांचा कधीही पराभव होणार नाही असे खात्रीवचन दिले आहे.

ब्रह्मदेवांची ही शुभवचने ऐकून साक्षात् अग्निदेव सीतेला (बालावस्थेत) कडेवर घेऊन उभे राहिले आणि तिला रामचंद्रांना अर्पण केले व रावणाच्या बंदीवासात असूनसुद्धा प्रलोभने, धाकदपटशा इत्यादीला बळी न पडता सीता श्रीरामांशीच एकनिष्ठ कशी होती, सर्वथैव शुद्ध कशी आहे हे अग्निदेवाने श्रीरामांना सांगितले.

धर्मपत्नी सीतेने सांगितल्यानंतर न पटलेले साक्षात अग्निदेवांनी सांगितल्यानंतर श्रीरामांना पटले आणि ते प्रसन्न झाले आणि काय म्हणाले? श्री प्रभु रामचंद्र म्हणाले, ‘भगवन्, लोकांना सीतेच्या पावित्र्याची खात्री पटावी म्हणून तिची ही शुद्धिपरीक्षा आवश्यक होती. कारण शुभलक्षणा सीतेला विवश होऊन दीर्घकालपर्यंत रावणाच्या अंतःपुरात राहावं लागलं आहे. जर मी जनकनंदिनीची शुद्धिपरीक्षा केली नसती, तर लोक हेच म्हणाले असते की, दशरथपुत्र राम मोठांच मूर्ख आणि लंपट आहे. मिथिलेशनंदिनी जनककुमारी सीतेचं हृदय माझ्याच ठायी गुंतलेलं आहे ही गोष्ट मीही जाणतो. ते माझ्यापासून कधीही विलग झालेलं नाही. ती सदैव माझ्या इच्छेनुसार वर्तन करते. माझं मन कधीही मोडत नाही. मला असाही विश्वास वाटत होता की, ज्याप्रमाणं महासागर आपला तट उल्लंघू शकत नाही, त्याचप्रमाणं रावण आपल्याच तेजानं सुरक्षित असलेल्या या विशाललोचना सीतेवर अत्याचार करू शकत नाही. तथापि तिन्ही लोकांतल्या प्राण्यांच्या मनांत विश्वास निर्माण करण्यासाठी एकमात्र सत्याचा आधार घेऊन मी अग्निप्रवेश करणाऱ्या विदेहकुमारी सीतेला अडविण्याचा प्रयत्न केला नाही. (११-१७)

‘मिथिलेशकुमारी सीता प्रज्वलित अग्नीच्या ज्वाळेसारखी दुर्धर्ष, तसंच परपुरुषाला अलभ्य आहे. दुष्टात्मा रावण मनानंही हिच्यावर अत्याचार करण्यास समर्थ नाही. ही सतीसाध्वी देवी रावणाच्या अंतःपुरात राहूनही व्याकुळ झाली नव्हती किंवा घाबरलेलीही नव्हती. कारण ही माझ्यापासून, जशी सूर्यदेवाला त्याची प्रभा तशीच अभिन्न आहे. मिथिलेशकुमार जानकी तिन्ही लोकांत परमपवित्र आहे. जसा मनस्वी पुरुष कीर्तीचा त्याग करू शकत नाही, तसाच मीही हिला सोडू शकत नाही. तुम्ही सारे लोकपाल माझ्या हिताचंच सांगता आहात आणि तुमचा माझ्यावर अत्यंत लोभ आहे म्हणून तुम्हां सर्व देवांच्या हितकर वचनाचं मला अवश्य पालन केलं पाहिजे!’ असे म्हणून स्वतः केलेल्या पराक्रमाने प्रशंसेला पात्र झालेले, महाबली, महायशस्वी, विजयी वीर रघुकुलनंदन श्रीराम आपल्या प्रियेला, सीतेला भेटले आणि त्या मीलनानंतर मोठ्या सुखाचा अनुभव घेऊ लागले. कारण ते सुख भोगण्याच्या योग्यतेचेच आहे. (१८-२२) युद्धकांड सर्ग ११८

त्यानंतर, यथावकाश प्रभुरामचंद्र सीता, लक्ष्मण आणि आपल्या सर्व सैन्यासह अयोध्येला जातात. तेथे श्रीराम राज्यकारभार करू लागतात आणि सीतामाई आन्हिके उरकून देवपूजा करून पतीसेवेत मग्न राहाते. ‘धर्मज्ञ श्रीराम दिवसाच्या पूर्वभागात धर्मानुसार धार्मिक कृत्ये करीत होते आणि राहिलेला अर्धा दिवस अंतःपुरात राहात होते. सीतादेखील पूर्वान्हकाली देवपूजन आदी करून सासवांची समानरूपे सेवा पूजा करीत होती. त्यानंतर विचित्र वस्त्राभूषणांनी विभूषित होवून ती श्रीरामचंद्रांकडे जात होती.’ अयोध्येत आल्यानंतरचे श्रीराम आणि सीतामाईच्या सहजीवनाचे समग्र वर्णन श्रीवाल्मिकी रामायणाच्या उत्तरकांडात बेचाळिसाव्या सर्गामध्ये विस्ताराने दिले आहे. ‘तऱ्हातऱ्हांच्या भोगांचा उपभोग घेणाऱ्या या राजदंपतीचा तो शिशिरकाल याप्रमाणे निघून गेला.’ आणि एक दिवस ‘श्रीरामचंद्रांना आपली पत्नी गर्भाच्या मंगलमय चिन्हांनी युक्त झालेली दिसली. ते पाहून त्यांना अनुमप हर्ष प्राप्त झाला आणि ते ‘साधु, साधु’ असे म्हणाले.’ श्रीरामांनी सीतेला विचारले, ‘तुझ्या गर्भातून पुत्रप्राप्ती होण्याचा काळ आला आहे. सांग, तुझी काय इच्छा आहे? मी तुझा कोणता मनोरथ पूर्ण करू?’

यावर सीतेने मंद हसून उत्तर दिले, ‘रघुनाथा, माझी इच्छा सांगते. मला एकवेळ गंगेजवळची तपोवनं पाहावीशी वाटतात. देवा, गंगातटावर फळमुळं खाऊन राहाणारे जे उग्र तेजस्वी महर्षी आहेत, त्यांच्याजवळ मी राहू इच्छिते. कुकुस्था, फळमूळांचा आहार करणाऱ्या महात्म्यांच्या त्या तपोवनात एक रात्र निवास करावा, हीच माझी या गर्भावस्थेतील सगळ्यात उत्कट इच्छा आहे.’ श्रीरामांनी म्हटले, “तू उद्याच तिथं जाशील याबद्दल शंका बाळगू नकोस.”

खरंच श्रीरामांनी सीतामाईची इच्छा पूर्ण केली का? पुढील लेखांकात वाचा.

(या टीपणाचा आधार : श्रीवाल्मिकी रामायण युद्धकांड सर्ग : ११६/११७/११८/११९/व उत्तरकांड सर्ग ४२)

●●●

# सीताशेती

**बाह्यसामुग्रीवर अवलंबून नसलेली शेती**

**प्रयोग सूत्र २ : पूर्ण कुजलेलेच घटक गोळा करणे**

प्रयोग सूत्र १ मध्ये कचरा गोळा करणे व कुजविणे या संबंधी सूचना दिल्या होत्या.

कचरा गोळा केला म्हणजे त्यात जसे कुजण्याच्या कालावधीनुसार वेगवेगळे घटक असतात तसेच सर्वसाधारणपणे ज्याला आपण 'कचरा' म्हणतो त्यात संपूर्णपणे कुजलेले घटकही असू शकतात.

एखादा पदार्थ कुजतो म्हणजे काय होते? त्या पदार्थात ओलावा आणि उब असली तर तेथे जिवाणू (Bacteria) ची वाढ होऊ लागते. हे जिवाणू हवेतील नत्र (Nitrogen) आणि पदार्थातील अन्नघटक यांच्या साहाय्याने जगत, वाढणारी असतात. जिवाणूंचीही एक एकमेकांवर जगत वाढत साखळी असते. या साखळीतील अंतीम जातीतील जिवाणू मागील जिवाणूंकडून घेतलेल्या नत्रयुक्त पदार्थाचे वनस्पतीला आवश्यक अशा नत्रयुक्त पदार्थामध्ये रूपांतर करतात. मूळ कुजणाऱ्या पदार्थातील अन्नघटक संपुष्टात आले म्हणजे जिवाणूंची ही साखळी क्रमाक्रमाने मरत जाते आणि शेवटी पूर्ण कुजलेला, वनस्पतीस आवश्यक असलेल्या नत्रयुक्त पदार्थाने परिपूर्ण 'कचरा' तयार होतो. वनस्पतीला हवेतील नत्र परस्पर वापरता येत नाही. तिची नत्राची गरज जिवाणूंच्या साखळीने तयार केलेल्या पूर्ण कुजलेल्या पदार्थातून किंवा कृत्रिमरित्या दिलेल्या रासायनिक खतातूनच भागविता येते.

आपल्या परिसरात नैसर्गिकरित्या कुजलेले कचऱ्याचे घटकही मिळतात. घराची जुनी कुडे, झांजा, शाकारणीचे छप्पर, रस्त्याकडेची माती, झाडांखालची माती, काळे पडलेले धसकट इत्यादि पदार्थ पूर्ण कुजलेल्या घटकांनी म्हणजे जिवाणूंच्या प्रेतांनी युक्त असतात. (पूर्ण कुजलेला पदार्थ कसा ओळखावा हे प्रयोगसूत्र १ मध्ये दिले आहे.)

अशा प्रकारचा पूर्ण कुजलेला घटक गोळा करून त्याचे वजन, तो गोळा करण्यासाठी लागणारा वेळ याचाही हिशोब ठेवावा.

(पुढील सूत्रात, पूर्ण कुजलेल्या घटकांचा वापर करून उपजाऊ माती कशी बनवायची याची माहिती करून घेऊ.)

**कृ. अ. प्र.**

# सीताशेती : आवाहन

शेतकरी संघटकच्या ६ डिसेंबर १९९१ च्या अंकापासून बाह्यसामुग्रीवर अवलंबून नसणारी शेती करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन म्हणून एका पद्धतीच्या प्रयोगाची सूत्रे द्यावयास सुरुवात केली आहे. विशेषतः, महिलांनी असा प्रयोग आणि तोही १ किंवा २ गुंठे जागेवरच करावा अशी अपेक्षा आहे. ही पद्धती म्हणजे एकमेव पद्धती आहे, असे नाही. उलट, ही आणि इतर काही पद्धतींचे प्रयोग करून त्यातून काही योग्य आणि उपयुक्त निष्कर्ष काढता यावे हा या मागचा हेतू आहे.

मग सक्रीय आणि नोंदल्या गेलेल्या सहभागाशिवाय हे कसे शक्य आहे म्हणून विनंती –

१. आपण प्रयोग करण्यास सुरुवात केली असल्यास आपले नाव, पत्ता, प्रयोगाखाली घेऊ इच्छिणाऱ्या जमिनीचा आकार, घरापासून अंतर, पाण्याची परिस्थिती – विहीर, सांडपाणी......, इत्यादि माहिती लिहून पाठवा.
२. प्रयोगसूत्रातील माहिती संबंधी काही शंका असल्यास, सूचना असल्यास त्या कळवा.
३. या माहितीला पर्यायी / पूरक माहिती आपल्याकडे असल्यास तीही कळवा.
४. बाह्यसामुग्रीविना आधीपासूनच आपण काही शेती करीत असल्यास त्याचीही माहिती कळवा. (इतरांचे, फक्त वाचलेले अनुभव नको.)

आपणाकडून झालेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे हे सदर चर्चात्मक स्वरूपाचे व्हावे अशी इच्छा आहे.

**कृषि अर्थ प्रबोधिनी,**
अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On th December, 1991

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
December 21, 1991

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

**(पान १३ वरून)**

(२०) कोल्हापूर – श्री. बाबूराव मगदूम
(२१) पुणे – श्री. नंदू लोखंडे
(२२) नगर – १) श्री. अनिल जयसिंगराव धनवट
२) सुभाष चोळके
(२३) जळगाव – श्री. दगडू एकनाथ शेळके
(२४) नाशिक – श्री. गणपत कातड
(२५) धुळे – श्री. खंडेराव भिला पाटील

●●●

## आजच्या अंकात –

भारत दशकातील चतुरंग शेती – शरद जोशी १
वर्धा बैठकीचा वृत्तांत ८
शेतकरी महिला आघाडीचा जाहिरनामा १०
नवीन कार्यकारिणीची यादी १३
सीतामाईच्या दुसऱ्या वनवासाची कहाणी – २ १४
सीताशेती – प्रयोगसूत्र २ १५

## शेतकरी संघटक आजीव वर्गणीदार
### ६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर १९९१ पर्यंत नोंदविलेले

४७. श्री. बाळकृष्णसाहेब निवृत्ती पाटील, खेडगाव (नाशिक)
४८. श्री. कृष्णराव श्रीधरराव देशमुख, निंबा (अकोला)
४९. श्री. भाऊराव भिमराव अहमदाबादे उदगीर (लातूर)
५०. श्री. किसनराव रंगनाथ शेवाळे, चिखली (बुलढाणा)
५१. श्री. वामराव रामचंद्र जाधव, पिंपळगाव (कुडा) (बुलढाणा)
५२. सौ. विमलताई वसंतराव पाटील, पुजदा (अमरावती)
५३. सौ. विमलाबाई शेषरावजी नंदुरकर, कारेगाव (यवतमाळ)
५४. श्री. रामसिंग झिपा राजपूत, लंघाणे (धुळे)
५५. सौ. द्वारकाबाई काळे, कवडा (अकोला)
५६. सौ. तुळसाबाई खुले, खापरवाडा (अकोला)
५७. सौ. उषाताई देशमुख, मनभा (अकोला)
५८. श्री. केशवराव आनंदराव गावंडे, केळीवेळी (अकोला)
५९. श्री. सुधाकर तुरके, आटमुर्डी (यवतमाळ)
६०. श्री. मोहनराव घोडे, कोंढा (यवतमाळ)
६१. श्री. विष्णुपंत देशमुख, कोंढा (यवतमाळ)
६२. श्री. संजय घोडे, कोंढा (यवतमाळ)
६३. श्री. विनायकराव शेळके, विटनापूर (यवतमाळ)
६४. श्री. डॉ. शामसुंदर गलाट, धानोरा (यवतमाळ)
६५. श्री. ज्ञानेश्वर डेहनकर, राणी अमरावती (यवतमाळ)
६६. सरपंच, ग्रामपंचायत चहांद, चहांद (यवतमाळ)
६७. सौ. सिंधुताई सुधाकरराव राऊत, पहूर (दाभा) (यवतमाळ)
६८. श्रीमती मदालसा नारायण (वर्धा)
६९. शेतकरी ग्राम कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, हेरले (कोल्हापूर)
७०. कामधेनू सह. दुध व्याव. संस्था मर्यादित, हेरले (कोल्हापूर)
७१. ग्रामसेवा विकास सेवा सो. लि., क।। रुकडी (कोल्हापूर)

●●●

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**